| महाराष्ट्र पोलीस | **प्रसिद्धिपत्रक**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६<br>फोन नं. ०२०-२६६८५००० | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जा.क्र./पोउआ/वाह/ १३०८ /२०२५ पुणे दिनांक -१५/ ०२ /२०२५

पुणे शहरातील विमाननगर वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, हडपसर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. " सदर ठिकाणी यापुर्वी काही पार्किंग संदर्भात आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे ".

**हडपसर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत**

- **मगरपट्टा चौकात ( नोबेल हॉस्पिटल चौक ) तात्पुरत्या स्वरुपात गोलाकार पद्धतीने वाहतुकीत खालील प्रमाणे बदल करण्याकरीता मगरपट्टा चौक प्रायोगिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे.**
- **मगरपटटा चौकातील ( नोबेल हॉस्पिटल चौक ) यु टर्न बंद करण्यात येत असल्याने वाहनांनी वैदवाडी चौकातुन यु टर्न घेवून इच्छितस्थळी जावे.**
- **मेगासेंटर बाजुने येणा-या वाहंनानी चौकातील पुलाखालुन यु टर्न घेवुन पुणे बाजुस जावे.**
- **हडपसर बाजुकडुन मगरपट्टा बाजुस जाण्यासाठी उड्डानपुल असल्याने सर्वानी त्यांचा वापर करावा.**
- **मगरपटटा चौकात ( नोबेल हॉस्पिटल चौक ) असलेला सिंग्नल बंद करण्यात येवुन हडपसर ते मगरपट्टा असा पुलाखालील रस्ता बंद करण्यात येत आहे.**
- **मगरपट्टा बाजुकडुन पुणे बाजुस जाण्यासाठी उड्डानपुल असल्याने सर्वानी त्यांचा वापर करावा.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ ऐअरपोर्ट रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – १५ / २ /२०२५ ते दिनांक –१/३/ /२०२५ पर्यत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.)

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ४,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी हडपसर** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर